**समाज विकास विभाग**
पुणे महानगरपालिका
जा. क्र. सविवि/2633
दि. 11/09/2020

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :– स्वच्छ सर्वेक्षण २०२० करीता पुणे मनपा प्रभाग निहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेबाबत.**

संदर्भ :– १. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/६६७ दि.२१/१२/२०१९
२. अति. महापालिका आयुक्त (वि.) कार्यालयाकडील जा. क्र. अतिमआवि/ सविवि/२५९९ दि.०२/०१/२०२० रोजीचे कार्यालयीन परिपत्रक.

स्वच्छ सर्वेक्षण २०२० करीता पुणे मनपा प्रभाग निहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेकरीता मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. १ चे ठरावान्वये मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांमार्फत कार्यवाही करावी.

पुणे महानगरपालिका मार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत पुणे मनपा प्रभागनिहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेत येत आहे. यामध्ये स्वच्छता विषयक जाणीव जागृती करणेकरीता विविध कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करणेत येणार आहे. त्यानुसार पुणे शहरातील झोपडपट्टीतील/ वस्तीतील स्थानिक मंडळ, बचत गट, शेजार समूह गट इ. लोकसहभाग होणार आहे.

सदर स्पर्धेच्या अनुषंगाने स्पर्धेचे स्वरूप, क्षेत्रिय कार्यालय, समाज विकास विभाग व घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्र. २ नुसार कार्यालयीन परिपत्रक प्रसुत केले आहे.

सदर कार्यालयीन परिपत्रका सोबत जोडणेत आलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये बदल करणेत आला असून सोबत जोडलेले परिशिष्ट 'अ' नुसार कार्यवाही करावी.

11/9/2020

(सुनिल इंदलकर)
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अवलोकनार्थ व माहितीसाठी –**

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज./इ./वि.), पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अंमलबजावणीसाठी –**

१) मा. सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग
२) मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग
३) मा. सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४
४) मा. उप आयुक्त (परिमंडळ क्र. १, २, ३ व ५)
५) मा. महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय १ ते १५)
पुणे महानगरपालिका

**सोबत –** परिशिष्ट 'अ'

D:\NEW_UCD3\Chavan Sir\ola suka kacharababat.doc

**समाज विकास विभाग**
**पुणे महानगरपालिका**
**स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा**
**परिशिष्ठ 'अ'**

- **स्वरूप** :– पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०१९–२०२० अंतर्गत पुणे मनपा प्रभागनिहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेत येणार आहे. यामध्ये स्वच्छता विषयक जाणीव जागृती करणेकरीता विविध कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करणेत येणार आहे.
- **कोण सहभागी होणार** :– पुणे शहरातील झोपडपट्टीतील स्थानिक मंडळ/बचत गट/शेजार समुह गट
- **नियम व अटी** :–

१. सदर स्पर्धा पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व वस्तीपातळीवर लागू राहील.
२. स्पर्धा नोंदणी अर्ज मुदतीत भरणे आवश्यक राहील. मुदतबाह्य अर्जांची नोंद घेणेत येणार नाही.
३. वस्तीतील कुटुंब संख्येच्या किमान ६०% शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ सहभाग असणे आवश्यक आहे.
४. सहभागी गटातील सभासदांनी ओला व सुका कचरा वेगळा करून ठेवणे तसेच कचरा वेचक, संस्था अथवा कलेक्शन सेंटर वर देणे बंधनकारक आहे.
५. वस्तीमध्ये ओला कचरा वर्गीकरण करण्याकरीता प्रबोधन करणे व अन्य कुटुंबांना प्रोत्साहन करणे.
६. ओला व सुका कचरा प्रत्येक घरटी कचरा वेचकांकडे देणे अथवा कलेक्शन सेंटर वर देण्यासाठी प्रोत्साहित करणे.
७. कचऱ्यापासून खत निर्मिती अथवा पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये वस्ती सहभागी झाल्यास त्यांना गुणांकनामध्ये १० बोनस गुण देणेत येतील.
८. पाण्याचा वापर काटकसरीने करणे.
९. सहभागी शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ यांनी पुणे मनपाच्या स्वच्छता ॲपचा वापर १००% करणे बंधनकारक राहील.
१०. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणेस पुढाकार. तसेच वस्तीतील इतर नागरिकांना प्रोत्साहित करणे.
११. सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता व दुरूस्ती याबाबत स्वच्छता ॲपवर तक्रारी दाखल करणे व नोंदी ठेवणे.
१२. वस्ती निहाय सार्वजनिक स्वच्छता समिती (संबंधित प्रभागातील मा. सभासद, प्रतिष्ठित व्यक्ती, सार्वजनिक मंडळ अध्यक्ष, बचत गट स्वयंसेविका, वस्तीतील नागरिक यापैकी किमान ५ व्यक्तींची समिती) स्थापन करणे आवश्यक राहील.
१३. उघड्यावर शौचास, उघड्यावर कचरा फेकणेस संबंधित सहभागी सदस्यांची तक्रार नसावी. अथवा वस्तीमध्ये असे प्रकार होऊ नयेत.
१४. सार्वजनिक ड्रेनेज व्यवस्था स्वच्छ ठेवणे.
१५. स्वच्छता जाणीव जागृती बाबत स्थानिक नागरिकांनी बैठका, प्रचार फेरी, प्रभात फेरी व तत्सम उपक्रम वस्तीमार्फत राबविलेबाबतचे पुरावे जोडणे आवश्यक राहील.

...२//

- **काय काय करायचे :-**
  १. स्वच्छ झोपडपट्टी संदर्भांत बैठका, प्रचार फेरी, प्रभात फेरी व तत्सम उपक्रम वस्तीमार्फत आयोजित करून जाणीव जागृती करणे.
  २. स्पर्धा कालावधीत ओला व सुका कचरा प्रत्येक कुटुंबाने वेगळा करून ठेवणे व वेगळा देणे.
  ३. ओला व सुका कचरा प्रत्येक घरटी कचरा वेचकांकडे देणे अथवा कलेक्शन सेंटर वर देणे.
  ४. पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता ॲपवर शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ यांची नोंद करणे व वस्ती पातळीवर नागरिकांना स्वच्छता ॲपचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
  ५. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणे. तसेच वस्तीतील इतर नागरिकांना प्रोत्साहित करणे.
  ६. सार्वजनिक स्वच्छता अभियान (श्रमदान) राबविणे.
  ७. प्रतिबंधीत प्लॅस्टिकचा वापर न करणे.
  ८. पाण्याचा वापर काटकसरीने करणे.

- **सलग्न मदत काय लागणार आहे :-** घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून स्वच्छ झोपडपट्टी संदर्भांत हॅन्डबील, बॅनर, पोस्टर्सचे नमुने, क्षेत्रिय कार्यालयांकडून श्रमदानासाठी लागणारे साहित्य, स्पर्धेसाठी आवश्यक साहित्य उदा. झाडु, खराटे वगैरे व तद्नुषंगिक आवश्यक साहित्य, वस्तीमधील/सार्वजनिक/ पुणे महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये रंगरंगोटी अथवा भित्तीचित्रे काढण्यासाठी (उदा. रंग, ब्रश इ.), निवड प्रक्रियेतून निवड झालेल्या संस्थांच्या माध्यमातून पथनाट्य सादर करणारे पथक, व्याख्याते, तज्ञ व्यक्ती

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका